(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# “महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पना आणि आजचे वास्तव एक चिकित्सक अभ्यास”.

**प्रा.डॉ.संतोष केशव खडसे,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर

---

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्था गेल्या हजारो वर्षांपासून चातुवर्ण व्यवस्था व जाती व्यवस्थाप्रणित होती. त्यामुळे भारत देशांमध्ये प्रचंड स्वरूपामध्ये विषमता निर्माण झाली. भारतातील सामाजिक विषमतेमुळे या देशांमध्ये काही जातींना उपजीविकेचे साधन उपलब्ध झाले तर काही जाती प्रशासन आणि राजकारणाच्या सत्तास्थानी असल्यामुळे त्यांचा सर्व प्रकारचा विकास झाला तर काही जाती ह्या गावकुसाबाहेर व भटक्या आणि आदिवासी असल्यामुळे त्यांचा कोणत्या प्रकारचा विकास झाला नाही. त्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील आणि भारतीय राज्यघटनेचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान समाजसुधारकांनी या देशातील सामाजिक व जातीय विषमता नष्ट झाली पाहिजे तसेच या देशातील सर्व जाती धर्मातील लोकांचा विकास झाला पाहिजे. या देशातील सर्व लोकांना उपजीविकेचे साधन उपलब्ध झाले पाहिजे.[1] अशा पद्धतीची मांडणी करण्याचा प्रयत्न या समाजसुधारकांनी केला.

अशाच पद्धतीचा विचार महात्मा गांधी यांनी विश्वस्त संकल्पना सिद्धांत समाजासमोर मांडला. या देशातील जमीनदार, भांडवलदार आणि श्रीमंत व्यक्तीने समाजाचे विश्वस्त म्हणून या देशातील सर्व गोरगरिबांना आपल्याकडील असलेली संपत्ती आपल्या गरजेपुरती ठेवून इतर संपत्तीचे वाटप करावे आणि आपल्याबरोबर इतरही लोकांचा विकास करावा अशा पद्धतीचे विचार मांडले.

महात्मा गांधी यांचे स्वतंत्र भारताचे स्वप्न होते मात्र ते केवळ भारत स्वतंत्र झाला म्हणजे पुरेसे नाही तर भारत स्वावलंबी असणे आवश्यक आहे, त्यासाठी सर्व लोकांचा विकास व्हावा.[2] तसेच या देशातील साधन संपत्तीचे सर्व लोकांना वाटप व्हावे यासाठी आपल्या आयुष्यामध्ये अतिशय महत्त्वाची मांडणी केली ती म्हणजे आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी विश्वस्त ही संकल्पना मांडली.

**संशोधनाची उद्दिष्टे** :

1.महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पना अभ्यासणे.

2. विश्वस्त संकल्पनेची आजची गरज तसेच वास्तव याचा अभ्यास करणे.

**संशोधन गृहितक** :-

1. महात्मा गांधींचे विश्वस्त संकल्पना भारतीय विषमता नष्ट करण्यासाठी होती.

2 महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना भारतामध्ये अस्तित्वात आली नाही. मात्र महात्मा गांधींच्या विश्वस्त संकल्पनेची सध्या खूप गरज आहे या शिवाय आर्थिक विषमता कमी होणार नाही .

**संशोधन पद्धती:**

सदर शोधनिबंध लिहिण्यासाठी ऐतिहासिक,वर्णनात्मक,ग्रंथालयीन पद्धतीचा वापर केला असून तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनाचा वापर केला आहे.

**Key Concept :-**

**विश्वस्त संकल्पना:** समाजाचे आपण पालन पोषण करणारे आहोत आणि आपल्यासारखेच इतरानाही चांगले जगण्याचा अधिकार आहे हे श्रीमंत भांडवलदार व जमीनदाराना वाटणेआणि आपली गरजेपेक्षा जास्त असणारी विश्वस्त म्हणून संपती समाजाला वाटणे.

**जातिव्यवस्था :** मनुस्मुतीने समाजात विषमता निर्माण करण्यासाठी केलेली व्यवस्था.

**चातुर्वर्ण व्यवस्था :** भारतीय समाजात चार वर्ण करून विषमता निर्माण करण्यासाठी केलेली व्यवस्था.

**जमीनदार :** ज्यांच्याकडे शेकडो, हजारो एकर शेती आहे असा समाजातील श्रीमंत शेतकरी.

**महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पना :** समाजात सर्वत्र अर्थमुलक विषमता व शोषण आढळते आणि त्यामुळे समाजामध्ये वर्गविग्रह चालू असतो त्याला पर्याय म्हणून महात्मा गांधींनी विश्वस्तपणाचा सिद्धांत मांडला. मानवाने

दुसऱ्याच्या सहकार्याने आज पर्यंत जो विकास केला तो अद्भुतच आहे. निसर्गाला व आपल्यापेक्षा बलिष्ठ पशुला त्याने आपल्या बुद्धीने वश करून आपले जीवन सुरक्षित केले व अधिक सुखद बनवले. मानवातील सहकार्याचे उचित मूल्यांकन व्हावे म्हणून विनिमयाला समाज जीवनात त्याने स्थान दिले. परंतु या अर्थाने मानव समाजात विषमता निर्माण केली आणि शोषणाला जन्म दिला[3]. हे पाहून समाजात समता निर्माण व्हावी यासाठी अनेक समाज सुधारक व थोर महापुरुष यांनी निरनिराळे उपाययोजना सुचवल्या, ज्यांच्यामुळे भारतीय समाजात समता निर्माण होईल. सर्वांना आपला विकास साधण्याची संधी मिळावी परंतु या प्रयत्नात भारतामध्ये यश मिळाले नाही समाजात विषमता कायम असून समाज व्यवस्था निर्माण झालेली आहे भारतीय हिंदू समाजात असणारी असमानता समाजाची दुर्बलता वाढणारी असून मानवी विकासामध्ये फार मोठा अडथळाठरला आहे.

समाजात जितका मोठा दलित वर्ग व मागासवर्ग राहील त्या प्रमाणात समाज दुबळा. प्राचीन काळापासून ही विषमता दूर करण्याचे प्रयत्न झाले परंतु त्याला म्हणावे तेवढे यश मिळाले नाही[4]. महात्मा गांधी म्हणतात जरी उद्योगधंद्यात किंवा वारसा हक्काने संपत्ती मिळाली तरी ती संपत्ती त्या व्यक्तीची नसते त्याचा तर इतकाच अधिकार आहे की, ज्या रीतीने लाखो लोक आपला उदरनिर्वाह करतात. त्याचप्रमाणे त्याने सन्मानपूर्वक आपला निर्वाह करावा. त्या संपत्तीवर राष्ट्राचा हक्क असून त्याचा उपयोग राष्ट्रहितासाठी झाला पाहिजे हा सिद्धांत त्यांनी मांडला. उपरोक्त विश्वस्त ही गांधीवादी अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाची संकल्पना आहे. महात्मा गांधींनी श्रीमंतांनी संपत्तीचे विश्वस्त व्हावे, स्वामी होऊ नये अशी कल्पना मांडली होती याचा अर्थ श्रीमंतांनी आपली मालमत्ता लोक हितार्थ वापरावी केवळ स्वतःच्या उपभोगासाठी वापरू नये असे त्यांना अपेक्षित होते[5]. माणसाने आपल्या गरजा किमान ठेवाव्यात, सन्मानाने जगण्यास लागणाऱ्या संपत्तीपेक्षा जेवढी जास्त संपत्ती असेल त्यावर श्रीमंतांनी हक्क सांगू नये, त्या संपत्तीवर समाजाची मालकी असावी व ती संपत्ती समाजाच्या कल्याणासाठीच वापरली जावी असे महात्मा गांधींना वाटत होते. भांडवलदार, जमीनदार संस्थांनी सरंजामदार यांनी विश्वस्त कल्पना अमलात आणल्यास समाजातील आर्थिक विषमता नष्ट होईल या कल्पनेनुसार भांडवलदार स्वतःहून कारखान्यावरील मालकी हक्क सोडून देऊन विश्वस्त भूमिका बजावतील व कामगारही मालकाच्या बरोबरीने विश्वस्त बनते, या मार्गाने आर्थिक समानतेवर आधारित अर्थव्यवस्था निर्माण होईल असे महात्मा गांधींचे मत होते.[6]

महात्मा गांधी यांनी विश्वस्त ही संकल्पना गुजरात मधील वैश्य जैन समाजातून घेतली त्याही काळ गुजरात मधील 'आनंदजी कल्याणजी ट्रस्ट' कडे अनेक देवळाचे व्यवस्थापन होते ही मंडळी देवळाची संपत्ती देवळाच्या ताब्यात असलेली जमीन वगैरे व्यवस्थापन विश्वस्त या भावनेतून करत होती. या मागची तात्विक भूमिका अशी होती की, हे सर्व जग देवाचे आहे या जगातील संपत्ती सुद्धा देवाची म्हणजे परमेश्वराची आहे. मी फक्त विश्वस्त नात्याने या संपत्तीचा कारभार पाहतो[7]. गांधीजींच्या मांडणीनुसार आधुनिक काळात श्रीमंतांनी विश्वस्ताच्या भूमिकेतून त्यांच्या संपत्तीचे व्यवस्थापन करावे. यामुळे गरीब- श्रीमंत यांच्यातील आर्थिक विषमतेची दरी कमी होईल. मात्र हे काम मार्क्सने सांगितलेल्या रक्तरंजित क्रांतीनुसार नव्हे तर महात्मा गांधी असे म्हणतात की श्रीमंताचे हृदय परिवर्तन करून हे काम करणे योग्य होईल.याकाळात भांडवलदारात नैतिकता आणायचे असेल तर भांडवलदारांनी विश्वस्त झाले पाहिजे. विकासाची फळ सर्वांबरोबर वाटून घेतली पाहिजेत.

**निष्कर्ष:**

आपल्याला मिळालेल्या संपत्तीची उधळपट्टी करण्यापेक्षा समाजातील गरजू लोकांना विश्वस्त या नात्याने वाटप केली पाहिजे.

विश्वस्त मार्गाने भांडवलशाहीचे रूपांतर आर्थिक समतेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत होईल असे त्यांचे मत होते. श्रीमंत, जमीनदार व कारखानदार विश्वस्तांची भूमिका अमान्य करू लागल्यास अहिंसक असहकार मार्गाचा वापर करावा असेही त्यांनी सुचवले[8]. विश्वस्त संकल्पना ही माणसाच्या चांगुलपणावर आणि सतप्रवृत्तीवर भर देणारी नैतिक संकल्पना असून तिचा उगम प्युरीटन धर्म मतांमध्ये आहे. 1942 मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटन प्रसंगी त्यांनी प्रथमच विश्वस्त संकल्पनेचा उल्लेख केला. यावेळी संस्थानिकानी प्रजेच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून प्रजेच्या कल्याणासाठी राज्याच्या उत्पन्नाचा विनियोग करावा असा सल्ला त्यांनी आपल्या संस्थानिकाना भाषणात दिला[9]. 1942 मध्ये त्याने आपले सहकारी किशोर लाल मशरूवाला, नरहरी पारीख आणि प्यारेलाल यांच्याशी विश्वस्त

संकल्पनेची चर्चा करून एक मसुदा तयार केला आणि सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानात आर्थिक व सामाजिक समतेला प्राधान्य देऊन विश्वस्त कल्पना आधारभूत मानली.

**विश्वस्त संकल्पनेचे मार्ग**:

1.श्रीमंतांनी आपल्या गरजा कमी कराव्यात.

2. श्रीमंतांनी आवश्यक तेवढी संपत्ती बाळगावी.

3. श्रीमंताकडे गरजेपेक्षा जास्त असणारी संपत्ती समाजातील गरजूंना विश्वस्त म्हणून वाटप करावी.

**विश्वस्ताची तत्त्वे** :

1.संपत्तीचे समान वाटप

2. संपत्ती परमेश्वराची मानून तिच्यावरील हक्क सोडून समाजाच्या विश्वस्त म्हणून काम करणे.

3.श्रीमंत, कारखानदार, जमीनदार यांचे हृदय परिवर्तन करणे.

**महात्मा गांधी यांच्या विश्वस्त संकल्पनेचे मूल्यमापन.**

1.महात्मा गांधी यांच्या विश्वस्त संकल्पनेचा अभ्यास केल्यास विश्वस्त संकल्पना सैद्धांतिक पातळीवर आणि आध्यात्मिक पातळीवर अतिशय चांगली आहे कारण नैतिक पातळीवर श्रीमंताने आपली गरजेपेक्षा जास्त संपत्ती ही समाजाच्या स्वाधीन केली तर नक्कीच समाजातील मागास लोकांचा विकास होईल[10].

2.मात्र आज श्रीमंत, भांडवलदारांनी, जमीनदार हे लोक समाजाचे पालक म्हणून विश्वस्त व्हायला तयार होत असताना दिसत नाहीत. आज भारतामध्ये आणि जगामध्ये श्रीमंत होण्यासाठी किंवा श्रीमंतांची यादीत येण्यासाठी प्रचंड स्पर्धा सुरू झालेली आहे. श्रीमंत उद्योगपती यांची संपत्ती वर्षाला कोट्यावधी रुपयाची वाढत आहे. आज मध्यमवर्गीय माणूस सुद्धा श्रीमंताच्या यादीमध्ये जाण्यासाठी किंवा करोडपती होण्यासाठी धडपडत आहे. आपल्या संपत्तीतील एक रुपया सुद्धा गोरगरीब लोकांच्या कल्याणासाठी देण्यास तयार होत नाही.

3.आज गोरगरीब लोकांचे प्रचंड स्वरूपात आर्थिक शोषण होत आहे. राज्य पुरस्कृत प्रशासनामध्ये आणि राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक भ्रष्टाचार होत आहे. यातून राज्यकर्ते आणि प्रशासकीय अधिकारी कोट्याधीश होऊन करोडपतीच्या यादीत जात आहेत. आज एका बाजूला कोट्यावधी रुपयाची बंगले व इमारती आहेत तर त्याच्या दुसऱ्या बाजूला गोरगरिबांच्या झोपडपट्टी आणि रस्त्यावर संसार करत असलेल्या खोपड्या दिसत आहेत.

**निष्कर्ष:** महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पना आज स्वप्नाळू ठरवून कालबाह्य झालेली आहेअसे अनेक अभ्यासकांना वाटते मात्र खऱ्या अर्थाने समाजात आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी गरीब व श्रीमंताची दरी कमी करण्यासाठी या देशातील सर्व लोकांना आपल्या देशाविषयी अभिमान निर्माण करण्यासाठी आणि मागास जाती जमाती व भटक्या जाती जमातींना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासठी महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. विश्वस्त संकल्पनेचे महत्त्व नाकारून चालणार नाही जर ही विश्वस्त संकल्पना काँग्रेस पक्षाने किंवा गांधीवादी उद्योगपती व भांडवलदाराने व जमीनदाराने जरी अमलात आणली तरी देखील या देशातली गरिबी 70 ते 80 टक्के कमी होईल यात कोणती शंका नाही.

**संदर्भ सूची** :

1. डॉ.सुनिता बोर्डे ,डॉ.संतोष खडसे, 'भारतातील ऐतिहासिक परीप्रेक्षातील स्त्रिया' शुभम पब्लिकेशन, पुणे

2. डॉ.चौसाळकर अशोक, साठे सत्यरंजन , 'विश्वस्त पद्धती' विकासपीडिया.

3. दा.न. शिखरे, संपादक, 'महात्मा गांधी गौरव ग्रंथ' जन्मशताब्दी निमित्त प्रकाशन, महात्मा गांधी स्मारक निधी, पुणे, 4 पेज नंबर 346.

4. उपरोक्त. 5. उपरोक्त.

6. डॉ.चौसाळकर अशोक, साठे सत्यरंजन 'विश्वस्त पद्धती', विकासपीडिया

7.डॉ.चौसाळकर अशोक, साठे सत्यरंजन विश्वस्त पद्धती विकासपीडिया

8.जयतीर्थ राव इकॉनॉमिस्ट गांधी, प्रकाशक पेंग्विन रँडम हाऊस इंडिया

9.जयतीर्थ राव इकॉनॉमिस्ट गांधी, प्रकाशक पेंग्विन रँडम हाऊस इंडिया.

10.Chaudhari R.N International Mandate and Trusteeship System, The Hague,1955